कार्यालयीन टिपणी

सादर, दि.२५.०८.२०२२ ९५। टी

विषय :- स्मार्ट प्रकल्पास सेदान श्रेणीतील दोन वाहने उपलब्ध करुन देणेबाबत.

वरील विषयाबाबत सविनय सादर करण्यात येते की, स्मार्ट प्रकल्पास स्विफ्ट डिजायर या श्रेणीतील दोन वाहने उपलब्ध करुन घेणेबाबतच्या पृष्ठ क्र.०६/टि वरील मान्यतेनुसार मे. सनी ट्रॅव्हल्स यांना पृष्ठ क्र.३१/प प्रमाणे पत्र देण्यात आले आहे.

पृष्ठ क्र. ३३/प व ३५/प वरील मे. सनी ट्रॅव्हल्स यांच्या पत्राचे कृपया अवलोकन व्हावे.

१) पृष्ठ क्र. ३३/प वरील पत्रानुसार त्यांनी सध्या सी.एन.जी. वर चालणा-या वाहनांचे उत्पादन होत असल्याने त्यांचेकडे सन २०१८ मधील उपलब्ध असलेले सी.एन.जी. वर चालणारे वाहन उपलब्ध करुन द्यावे अथवा २०१७ मधील डिझेल इंधनावर चालणारी उत्कृष्ट स्थितीतील स्विफ्ट डिजायर उपलब्ध करुन द्यावी. याबावत विचारणा केलेली आहे.

२) पृष्ठ क्र. ३५/प वरील पत्रानुसार वाहन पुरवठा करारनाम्यात नमुद केलेले स्विफ्ट डिजायर वाहन उपलब्ध करुन द्यावे अथवा त्याच सेदान श्रेणीतील हुंडाई एक्सेंट हे उत्कृष्ट स्थितीतील वाहन उपलब्ध करुन द्यावे. याबाबतही विचारणा केलेली आहे.

मे. सनी ट्रॅव्हल्स यांची पत्रात नमुद केलेल्या दोन्ही वाहनाची पाहणी केली असता २०१७ मधील स्विफ्ट डिजायर व दुसरे वाहन स्विफ्ट डिजायर ऐवजी सेदान श्रेणीतील हुंडाई एक्सेंट हे वाहन स्मार्ट प्रकल्पास उपलब्ध करुन देणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. मान्यता तथा आदेशार्थ सादर. मान्य झाल्यास मे. सनी ट्रॅव्हल्स यांना द्यावयाचे पत्र प्रारुप स्वाक्षरीस्तव सादर.

(अजय पाटील)
तंत्र अधिकारी

(अर्जुन वाघमोडे)
प्रशासकीय अधिकारी

(श्री. ज्ञानेश्वर मोटे)
अतिरिक्त प्रकल्प संचालक

C:\Users\Administrator\Desktop\patil sir\leeter and noting.docx 317

Scanned with OKEN Scanner

# कृषि विभाग

## मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प

## प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष

शेती महामंडळ बिल्डींग, २७० भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, सिंबॉयसीस कॉलेज जवळ, पुणे-४११०१६

फोन नं.०२०-२५६५६५७७ / ७८, ई-मेल-pcmu.smart@gmail.com, वेबसाईट-www.smart-mh.org


जा.क्र. स्मार्ट/पीसीएमयु/प्रशासन/१२५५/२०२२ दि. २५/०८/२०२२.

प्रति,

मे. सनी ट्रॅव्हल्स,
मधुश्री सोसायटी,
जे-५२, गणेश मळा,
सिंहगड रोड, पुणे-३०.

**विषय :- स्मार्ट प्रकल्पास सेदान श्रेणीतील दोन वाहने उपलब्ध करुन देणेबाबत.**

**संदर्भ:-** १) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.प्र.व्य.क./स्मार्ट/Hiring Vehicle/१२२०/२०२२ दि.१८.०८.२०२२
२)आपले दि.२२.०८.२०२२ रोजीचे पत्र
३) आपले दि. २४.०८.२०२२ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, संदर्भ क्र. ०१ नुसार स्मार्ट प्रकल्पाकरिता दोन स्विफ्ट डिजायर श्रेणीतील वाहने उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

संदर्भ क्र. ०२ नुसार सध्या सी.एन.जी. वर चालणा-या वाहनांचे उत्पादन होत असल्याने आपल्याकडे उपलब्ध असलेले सन २०१८ मधील सी.एन.जी. वर चालणारे वाहन द्यावे अथवा २०१७ मधील उत्कृष्ट स्थितीतील डिझेल इंधनावर चालणारी स्विफ्ट डिजायर उपलब्ध करुन द्यावी. याबाबत विचारणा केलेली आहे. तसेच संदर्भ क्र. ०३ नुसार सेदान श्रेणीतील स्विफ्ट डिजायर ऐवजी हुंडाई एक्सेंट हे वाहन उपलब्ध करुन द्यावे. याबाबत विचारणा केलेली आहे.

आपणांस निर्देशित करण्यात येते की, सी.एन.जी. वर चालणारे स्विफ्ट डिजायर ऐवजी सन २०१७ मधील डिझेल इंधनावर चालणारी स्विफ्ट डिजायर तसेच हुंडाई एक्सेंट ही दोन वाहने प्रकल्पास उपलब्ध करुन द्यावे.

(ज्ञानेश्वर बोटे)
अतिरिक्त प्रकल्प संचालक, स्मार्ट.



Scanned with OKEN Scanner

# SUNNY TRAVEL

**All Types of Cars & Buses on Rent**

Madhavshri Soc. J-52, Ganesh Mala, Sinhagad Road, Pune - 411 030.
Mob. 94 22 32 27 72 / 98 60 05 34 46


५२१५

दि. २४.०८.२०२२

प्रति,
**मा. प्रकल्प संचालक,**
**स्मार्ट, पुणे.**
जुने पासपोर्ट कार्यालय,
सेनापती बापट रोड, पुणे.

**विषय: वाहन पुरवठा करणेबाबत...**
संदर्भ: आपले कार्यालयाशी झालेला दि. 11.10.2021 रोजीचा वाहन पुरवठा करणेबाबतचा करार..

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून सादर की,

संदर्भीय पत्रान्वये आपले कार्यालयास वाहन पुरवठा करणेबाबत करार केलेला असून करारातील अटीनुसार पुरवठा केले जाणारे वाहन हे सन 2018 नंतरचे असणे आवश्यक आहे. परंतु महोदय आम्ही नम्रपणे आपले निदर्शनास आणु इच्छीतो की सद्यस्थितीमध्ये सी. एन. जी. इंधनावर चालणाऱ्या वाहनांचे उत्पादन होत असून आमचेकडे 2018 नंतरचे सी. एन. जी. वर चालणारे वाहन उपलब्ध आहे; परंतु स्मार्ट प्रकल्पाशी झालेल्या चर्चेनुसार सी. एन. जी. वर चालणारे वाहन पुरवठा करावयाचे नसल्याने आपणास 2017 या वर्षातील उत्कृष्ट स्थितीतील डिझेल इंधनावर चालणारे वाहन उपलब्ध करून द्यावे किंवा कसे याबाबत पुढील आदेश व्हावेत ही विनंती .

आपला विश्वासू,

**For SUNNY TRAVEL**
[signature]
**Proprietor**

State of Maharashtra's Agri-Business & Rural Transformation (SMART) Project
Project Coordination & Management U...
२४/०८ 2022
Section - 660 A
... No. -

Scanned with OKEN Scanner